ग्रामीण भागातील नागरिक गत महिण्याभरापासून विजेच्या लपंडावाने त्रस्त >> पान 2

जगबुडीने इशारा पातळी ओलांडली, नदीचं पाणी शहरात घुसलं >> पान 3

बालमृत्यू कमी करण्यासाठी 'स्टॉप डायरिया' अभियानाला जिल्ह्यात सुरुवात >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



सुबोध भावे घेऊन येतोय संत तुकाराम यांच्या जीवनावर आधारित नवीन बायोपिक!

**सुविचार**
प्रत्येक दिवशी नवीन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करा.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 279 ■ शुक्रवार, दि. 20 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नऊ टक्के व्याजदराने कर्ज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विविध विकास महामंडळ आणि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा संयुक्त उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना तसेच विविध महामंडळाअंतर्गत सुरू असलेल्या योजनेमार्फत शासन महिलांचे आर्थिक सबलीकरण करीत आहे. या लाभार्थी महिलांना आता आर्थिकरित्या अधिक सक्षम करण्यासाठी नऊ टक्के अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शासनामार्फत सुरू असलेल्या महिलांसाठीच्या व्याज परतावा योजनेची मुंबई बँकेच्या कर्ज योजनेसह सांगड घालून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासंदर्भात वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार तथा मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार चित्रा वाघ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, महामंडळाचे प्रतिनिधी, सहसचिव वि. रा.ठाकूर, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष मिलिंद कांबळे आदिसह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महिलांना स्वयंपूर्ण उद्योजक बनविण्यासाठी हा उपक्रम महत्वपूर्ण ठरणार आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी महामंडळ



आणि 'मुंबै बँक संयुक्तपणे हा उपक्रम राबविणार आहे. मुंबईतील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना आर्थिक साक्षर करण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून वैयक्तिक व सामुहिक कर्ज देऊन त्यांना उद्योग व व्यवसाय उभारणीसाठी मदत केली जाईल. तसेच पर्यटन संचालनालय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत विविध वैयक्तिक व गट कर्ज योजना राबविण्यात येतात. यामुळे महिलांना स्वत:चा व्यवसाय व उद्योग सुरू करण्यासाठी नऊ टक्के इतक्या अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

आमदार प्रवीण दरेकर यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना सुक्ष्म, लघू उद्योजक बनवून त्यांचे आर्थिक सबलीकरण करण्यात येणार असल्याचे यावेळी नमुद केले. मुंबै बँकेच्या विशेष कर्ज धोरण अंतर्गत वैयक्तिक व गटाला एक लाख व त्यापेक्षा जास्त कर्ज नऊ टक्के दराने अदा करण्यात येईल. मुंबई शहर आणि उपनगर येथे १६ लाख इतके लाभार्थी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## ठाकरेंच्या २२ नगरसेवकांना फोडण्यासाठी शिंदे गटाची मोठी ऑफर, विनायक राऊतांचा खळबळजनक आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतही ठाकरे गटाला मोठा धक्का बसला असून, मुंबईतील ठाकरे गटाचे दोन प्रमुख शिलेदार माजी नगरसेवक अजित भंडारी आणि शाखाप्रमुख संजय जंगम शिंदे गटात प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत. विशेष बाब म्हणजे, हे दोन्ही नेते काल मातोश्री येथे पार पडलेल्या माजी नगरसेवकांच्या बैठकीला उपस्थित होते. त्यामुळे बैठक संपल्यानंतर लगेचच त्यांनी शिंदे गटात जाण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या दिवशीच शिंदे गटाने ठाकरेंना मोठा राजकीय धक्का दिला आहे. आता यावरून ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांनी खळबळजनक आरोप केलाय.

विनायक राऊत म्हणाले की, २२ नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांना सांगितले की, आम्हाला कशाप्रकारे आमिष दाखवली जात आहेत. कशाप्रकारे आम्हाला शिंदे गटात बोलावलं जात आहे. बाजारात काही शिंदेंचे दलाल गिर्हाईक शोधत फिरत आहेत. दुसऱ्याकडून माल विकत घ्यायचा आणि स्वत:चा पक्ष चालवायचा, असे काम सुरु आहे. त्यांनी आधीच ठरवलं असणार पण उद्धव ठाकरे काय बोलतात यासाठी ते बैठकीला आले असतील. आम्हाला चुणूक होती की ते घेणे जाणार आहेत, असे त्यांनी म्हटले.

## काल मातोश्रीवरील बैठकीत उपस्थित, आज २ माजी नगरसेवक शिंदेंच्या शिवसेनेत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महानगरपालिका निवडणुकीचे वारे वेगात वाहू लागले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. अशातच ठाकरे गटाला राज्यभरात मोठी गळती लागल्याचं चित्र दिसून येत आहे. मुंबईत पुन्हा ठाकरेंच्या आणखी दोन शिलेदारांनी ठाकरेंची साथ सोडली आहे, मुंबईतील ठाकरेंच्या सेनेतील माजी नगरसेवक अजित भंडारी आणि शाखाप्रमुख संजय जंगम शिंदेंच्या सेनेत प्रवेश करणार आहेत. विशेष म्हणजे माजी नगरसेवक अजित भंडारी आणि शाखाप्रमुख संजय जंगम काल झालेल्या मातोश्री वरील माजी नगरसेवकांच्या बैठकीला उपस्थित होते. शिवसेनेच्या वर्धापन दिनादिवशी ठाकरेंना शिंदेंच्या शिवसेनेनं मोठा धक्का दिला आहे.

शिवसेना ठाकरे गटाच्या दोन नेते आज ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. विशेष म्हणजे काल मातोश्री वरील बैठकीमध्ये माजी नगरसेवक अजित भंडारी आणि शाखाप्रमुख संजय जंगम तिथे उपस्थित होते. मात्र, आज हे दोन माजी नगरसेवक शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. त्याचबरोबर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा देखील एक माजी नगरसेवक शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. विशेष म्हणजे काल (बुधवारी) उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवरती शिवसेनेच्या माजी नगरसेवकांची बैठक बोलावली होती, या बैठकीला हे दोन्ही माजी नगरसेवक उपस्थित होते. दरम्यान, आज वर्धापन दिनाच्या दिवशीच शिंदेंच्या शिवसेनेने उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिल्याचे बोलले जातेय.

## कॅनडामधील अनिवासी भारतीयांचा युपीआयद्वारे घरी पैसे पाठवण्याकडे कल

**मुंबई/प्रतिनिधी :** कॅनडामधील भारतीयांना सेवा देणाऱ्या बीकन या आघाडीच्या विदेशी फिनटेक प्लॅटफॉर्मने कॅनडातील अनिवासी भारतीयांमध्ये (एनआरआय) युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) वापरातील काही लक्षणीय ट्रेंडबाबत काही महत्त्वाची निरीक्षणे प्रकाशित केली आहेत. या निरीक्षणांमधून हे समजते की, अनिवासी भारतीय देशाबाहेरची पेमेंट आणि भारतातील आर्थिक जबाबदाऱ्या यांचे व्यवस्थापन करण्यासाठी जी पद्धत वापरत होते, त्यात मूलभूत परिवर्तन आले आहे. बीकनच्या विश्लेषणातून दिसून येते की, भारतात युपीआय हा जणू यूझर्सचा दुसरा स्वभाव बनला असल्यामुळे, विशेषत: अलीकडे स्थलांतरित झालेल्या एनआरआयमध्ये देखील हा स्वभाव ठळकपणे झळकतो कारण त्यांनाही आपल्या घरी पैसे पाठवण्यासाठी आणि खर्चाच्या व्यवस्थापनासाठी तशीच सुलभता आणि गती हवीहवीशी वाटत आहे.

## जे राज्याच्या मनात आहे तेच मी करेन, मराठी माणसाची शक्ती एकत्र येऊ नये म्हणून मालकाचे नोकर भेटीगाठी घेतात : उद्धव ठाकरे



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या वर्धापन दिन सोहळ्यात मनसे सोबतच्या युतीसंदर्भात सकारात्मक असल्याचे संकेत दिले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत युतीचा पर्याय अजून खुला असल्याचे संकेत उद्धव ठाकरे यांनी दिले. शिवसेनाप्रमुखांच्या ब्रँडचा उल्लेख करुन आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीनं उद्धव ठाकरेंनी एक पाऊल पुढं टाकलं आहे. जे तुमच्या मनात आहे, जे महाराष्ट्राच्या मनात आहे तेच करायला तयार आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

ही लढाई केवळ उद्धव ठाकरेंची नाही, शिवसेनेची नाही. १९६० साली ज्या मराठी माणसानं बलिदान देऊन, रक्त सांडून मुंबई मिळवून दिली, त्या मुंबईचं महत्त्व खत्म होऊ देणार नाही म्हणून उभं राहिलो तर मुंबई वाचेल, असं उद्धव ठाकरे म्हणाले. बातम्या सगळीकडे चालू आहेत, काय होणार, कसलं, नाही होणारं का? होणार की नाही होणार कळेल ना,जे यांच्या मनात आणि जे राज्याच्या मनात आहे तेच मी करेन असं उद्धव ठाकरे म्हणाले.

राज्याच्या जनतेच्या मनात जे आहे ते होऊ नये मराठी माणसाची शक्ती एकत्र येऊ नये म्हणून यांच्या मालकाचे नोकर इकडे गाठी भेटी घ्यायला लागले, हॉटेलमध्ये भेटत आहेत.मालकांचे नोकर तुम्ही जर का मुंबईवर तुम्हाला ताबा मिळाला नाही, पुन्हा मुंबई मराठी माणसाच्या ताब्यात गेली तर मालकाच्या मित्राचं कसं होणार, अदानीचं कसं होणार त्याच्यामुळं शेठजींचे नोकर, आणि शेठजींच्या नोकरांचे नोकर जे आज नालायकपणे वर्धापन दिन साजरा करत आहेत. अरे तुला काय करायचं तुला नाही होत, आमचं काय करायचं ते आम्ही बघू, असं आव्हान उद्वव ठाकरे यांनी दिले.

जर तुम्ही शिवसेनाप्रमुखांचा ब्रँड तुम्ही पुसून टाकणार असाल तर महाराष्ट्राच्या धरतीवरुन तुमचं नाव पुसून टाकणार आहोत. भाजपचं नामोनिशान पुसून टाकू, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. >> पान २

## देशातील सगळ्यात श्रीमंत तरुणांच्या यादीत आकाश आणि अनंत अंबानी; नेटवर्थ पाहून बसेल धक्का

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतातील लोकप्रिय बिझनेसमेन मुकेश अंबानी आणि त्यांचे कुटुंब हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. मुकेश अंबानी यांना दोन मुले असून आकाश आणि अनंत अशी त्यांची नावे आहेत. ३६० वन वेल्थ आणि क्रिसिल या संस्थांनी मिळून एक अहवाल तयार केला आहे. त्या अहवालात त्यांनी भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती कोण आहेत, याविषयी माहिती दिली आहे.



या अहवालानुसार, आकाश आणि अनंत अंबानी यांची मिळून अशी एकूण संपत्ती ३.५९ लाख कोटी इतकी आहे. या यादीत २०१३ भारतीयांच्या नावाचा समावेश आहे, ज्यांनी स्वत:च्या मेहनतीनं संपत्ती कमावली आहे. या सर्वांची मिळून एकूण संपत्ती सुमारे १०० लाख कोटी रुपये आहे. जी भारताच्या उइ च्या जवळपास >> पान २

## पुण्यात धो-धो पाऊस, रस्त्यांपासून वस्त्यांपर्यत पाणीच पाणी

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात पावसाचा जोर वाढला आहे. खडकवासला धरणातून २ हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग होणार आहे. थोड्याच वेळात पाण्याचा विसर्ग नदीत होणार आहे. नदीकाठ परिसरातील नागरिकांनी खबरदारी घेण्याचं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. नदीकाठच्या परिसरामध्ये ज्यांची गाड्या आणि जनावर आहेत, त्या नागरिकांनी त्यांना सुरक्षित स्थळी हलवावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पावसाचा जोर वाढल्यास विसर्ग वाढविण्यात येणार आहे. पुण्यातून वाहणारी मुळा नदीचे पात्र भरून वाहत आहे. पुणे शहर आणि आजूबाजूच्या परिसरात आज सकाळपासून मुसळधार पाऊस सुरू आहे.

## फडणवीसांच्या भेटीनंतर आता एकनाथ शिंदेंचा डाव, राज ठाकरेंना आपल्या बाजूने वळवण्यासाठी 'या' शिलेदारावर

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सुरु असतानाच आता महायुतीकडून राज ठाकरे यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी प्रयत्न सुरु झाले आहेत. गेल्याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या व्यग्र वेळापत्रकातून वेळ काढून मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली होती. तेव्हापासून मनसे भाजपशी हातमिळवणी करणार, अशी चर्चा रंगल्या होत्या. मात्र, आता महायुतीचा भाग असणाऱ्या शिंदे गटानेही राज ठाकरे यांची महत्त्व ओळखून त्यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

आगामी मुंबई आणि ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी राज ठाकरे हे आपल्यासोबत असावेत यासाठी उद्धव ठाकरेही प्रयत्नशील आहेत. परंतु, दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास मराठी मतं त्यांच्याकडे वळण्याचा धोका आहे. ठाकरे गटाच्या नेत्यांकडून मनसेसोबत युतीची वक्तव्यं आणि बॅनरबाजी सुरु आहे. या सगळ्या पार्श्र्वभूमीवर आता एकनाथ शिंदे यांनीही राज ठाकरेंना सोबत घेण्यासाठी प्रयत्न सुरु केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. >> पान २

# मुख्यमंत्र्यांना एलिमिनेट करण्यासाठी शिंदे गटाकडून अघोरी विद्येचा वापर

## संजय राऊतांचा गंभीर आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री भरत गोगावले यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये भरत गोगावले यांनी त्यांच्या घरी अघोरी पूजा केल्याचा दावा केला जात आहे. विशेष म्हणजे, हा व्हिडिओ महायुतीतील सहकारी पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे. याआधी अवघ्या दोन दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनीही असाच एक व्हिडिओ शेअर केला होता. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी गंभीर आरोप केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, शिंदे यांचा एक गट आहे जो अघोरी विद्येतून निर्माण झालेला आहे. अघोरींचा एक गट सर्वत्र असतो, धर्मक्षेत्रात, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात असतो. त्यांच्याकडे फार गांभीर्याने पाहण्याची



गरज नाही. कारण दिवसरात्र ते अघोरी विद्येत गुंतलेले असतात. दुसऱ्याचं आणि राज्याचं नुकसान कसं होईल आणि माझा कसा फायदा होईल? ही अंधश्रद्धा जरी असली तरी दुर्दैवाने महाराष्ट्रात जेव्हा आपण पुरोगामी म्हणून मिरवतो, त्या आमच्या पुरोगामीपणाला डाग लावणारी कृत्य आता समोर येत आहेत. महाराष्ट्राचे राजकारण जर अशा लोकांच्या हातात असेल तर हे शाहू-फुले- आंबेडकर-प्रबोधनकार ठाकरे यांच्या महाराष्ट्राचं दुर्दैव आहे. कोणत्या प्रकारचे लोक देवेंद्र फडणवीस यांच्या कॅबिनेटमध्ये आहेत? देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीला बसण्याआधी खुर्चीखाली वाकून बघायला पाहिजे नक्की काय आहे? काहीही होऊ शकते, असे त्यांनी म्हटले.

संजय राऊत पुढे म्हणाले की, महाराष्ट्राला काळीमा फासणारी ही कृती आहे. महाराष्ट्राने अंधश्रद्धेविरुद्ध कायम लढा दिला. महाराष्ट्राने धर्मांधतेविरुद्ध लढा दिला. >> पान २

## पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली

आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ञ डॉ सलीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ सलीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिंन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर – कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# ग्रामीण भागातील नागरिक गत महिण्याभरापासून विजेच्या लपंडावाने त्रस्त

## अधिकाऱ्यांना फोनची ऍलर्जी, तर लाईनमनला मुख्यालयाची एलर्जी

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** मे महिन्याच्या शेवटच्या पंधरवड्यापासून अवकाळी पावसामुळे तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील वीज वितरण व्यवस्था विस्कळीत झाली आहे मान्सून पूर्व कामे केले नसल्याचेही समोर आले आहे गत महिन्याभरापासून तालुक्यातील नागरिक विजेच्या लपंडावाने त्रस्त झाले आहेत अधिकाऱ्यांना फोनची ऍलर्जी तर लाईन मनला मुख्यालयी राहण्याची ऍलर्जी असल्याचे दिसून येत आहे .

मागील महिन्यापासून वीज टिकून राहत नाही सतत विजेचा लपंडाव सुरू असतो पिण्याचे पाणी तसेच गुरांना पाणी पाजण्या साठी खूप त्रास होत आहे आमच्या लाईन मनला फोन केला असता माझ्या भावाचा अपघात झाला, माझी तब्येत बरी नाही, मी मीटिंगमध्ये आहे, आज होणार नाही, दुसरा माणूस पाठवतो असे एक ना अनेक कारणे गत महिन्याभरापासून सांगत आहे आम्हाला लाईनमन बदलून दुसरा देण्यात यावा.

**–संतोष लांडगे.**
**शेतकरी भोकरखेडा तालुका रिसोड**

मागील एका महिण्या भरा पासुन रिसोड तालुक्यातील ग्रामीण फिडर वरील विजेच्या लपंडावाने नागरिक त्रस्त झाले आहे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ग्रामीण भागातील घरगुती पिठाच्या गिरण्या बंद लघुउद्योगासह,लहाण–मोठे व्यवसायीक कमालीचे त्रस्त झाले आसुन विज वितरण कंपनी कर्मचा–यांचे नेमके काय सुरू आहे. हे कोणालाच कळत नसल्याच्या तीव्र प्रडसाद उमटत आहेत समस्या सोडविण्याचे तर सोडाच अधिकारी फोनही उचलत नाहीत तर ग्रामीण भागात एकही लाईनमन मुख्यालय राहत नाही मान्सून पूर्व कामेही केले नसल्याचे समोर आले आहे त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या समस्या सोडणार तरी कोण असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे

मागील महिन्या मध्ये विजवितरण कंपनीने घरगुती विज मिटरच्या जागेवर डिजीटल विज मिटर एक प्रकारे दंडेल शाही केली असल्याची चर्चा आहे.ऐन पावसाळ्याच्या तोंडावरच दिवस–रात्री पाच ते सहा तास बत्तीगुल होत आसल्याने ग्रामीण भागातील लघुउद्योगावर एक प्रकारे संक्रांत आलेली दिसत आहे.नुकताच शाळांना प्रारंभ झाला आसतांनी आठवड्यातील प्रत्येक रात्रीला विजेचा लपंडाव सुरूच आहे.विजवितरण कंपनीच्या माध्यमातून पावसाळ्या पुर्वी विद्युत पोल वरील जिवंत तारां मध्ये गेलेल्या झाडांच्या फांद्या तोडण्याची मोहीम राबविल्या नंतरही जर शॉट सर्किट किंवा ब्रेक डाऊनच्या नावा खाली विजेचा लपंडाव सुरूच



आसेल तर विजेचे बिल भरायचे कशा साठी आशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.विशेष म्हणजे थकीत विज बिलासाठी विज वितरण कंपनी ज्या पध्दतीने गावा गावांना भेटी देत विजबिलाची वसुली करतात त्याचे प्रमाणे विद्युत पुरवठा होणे आवश्यक आसल्याची मागणी तालुक्यातील ग्रामीण भागामधुन होत आहे. विजेच्या प्रश्ना संदर्भात विजवितरण अभियंत्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला आसता.कुठलाच प्रसाद मिळत नाही सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी मागील महिन्यात हळदीची लागवड केली आहे परंतु शेतात वीजच नसल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत करावा तसेच लाईनमनला मुख्यालय राहण्याची सक्ती करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# महाराष्ट्रातील स्टार्टअप्सना आता गुगलचे बळ मिळणार

### – कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय स्टार्टअप्सना माहिती क्षेत्रातील जागतिक कंपनी गुगलचे बळ मिळणार असून या स्टार्टअप्सना उद्योगासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात संधी उपलब्ध होणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. गुगलच्या व्हेंचर कॅपिटल अँड सेटअप पार्टनरशिप विभागाचे प्रमुख डॉ.अपूर्व चॅमरिया यांनी मंत्री श्री. लोढा यांची मंत्रालयातील दालनात भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली.

महाराष्ट्रातील स्टार्टअप्सना जागतिक स्तरावर नेण्यासाठी मंत्री श्री. लोढा प्रयत्नशील आहेत. या अनुषंगाने माहिती क्षेत्रातील अग्रगण्य जागतिक कंपनी गुगलच्या सहकार्याने महाराष्ट्रात उद्योगाच्या नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. यावेळी कौशल्य विभागाचे आयुक्त लहुराज माळी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे बैठकीला उपस्थित होते.

जगातल्या नऊ देशात गुगलद्वारे एआय प्रशिक्षण सेंटर्स कार्यरत आहेत. स्टार्टअप्स करिता भारतातही अशाप्रकारचे सेंटर स्थापन करण्याचे नियोजन करत असल्याची माहिती यावेळी गुगलचे अधिकारी श्री. चॅमरिया यांनी दिली.

निवड प्रक्रियेद्वारे उत्कृष्ट ठरणाऱ्या स्टार्टअप्सना यात संधी मिळणार आहे. देशात अशा प्रकारचे हे पहिलेच केंद्र ठरणार असून महाराष्ट्रातील नव्या उमेदीने उद्योग करू पाहणाऱ्या युवकांना या निमित्ताने जागतिक कवाडे उघडणार असल्याचा विश्र्वास यावेळी मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला. सध्या यासंदर्भात प्राथमिक चर्चा सुरु असून लवकरच सामंजस्य करार होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान एकीकडे स्टार्टअप्ससाठी सेंटर तर आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे अभ्यासक्रम ही महाराष्ट्रात सुरु करण्याची तयारी गुगलने दाखवली आहे.

पान १ वरून...

## जे राज्याच्या मनात आहे तेच मी करेन,

माझी तयारी तुम्हाला सांगतो, १९९२–९३ साली दंगा झाला होता. देशद्रोह्यांच्या विरुद्ध शिवसैनिक रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी एक व्यक्ती बाळासाहेब ठाकरेंकडे आली होती, अशी आठवण उद्धव ठाकरे यांनी सांगितली. गद्दारांसमोर उभा आहे व मी म्हणतोय...कमॉन किल मी, तुम्ही अंगावर येणार असाल तर ॲम्ब्युलन्स घेऊन यायचं, येताना सरळ याल जाताना आडवे व्हाल, असा इशारा देखील उद्धव ठाकरे यांनी दिला.

आपल्याला भांडून चालणार नाही. मुंबईत हिंदू–हिंदूमध्ये मारामाऱ्या लावायच्या, हिंदी सक्ती करायची असेल तर देवेंद्र करुन बघा, ज्या हिंदी लोकांना १९९३ मध्ये वाचवलं, त्यांना आपल्या विरुद्ध उभं करतात. हिंदी सक्तीवरुन मुंबईत मराठी अमराठी वाद लावायचा आणि ते भ्रष्टाचार करायला मोकळे असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## देशातील सगळ्यात श्रीमंत

एक तृतीयांश आहे. या यादीत अशा लोकांचा समावेश आहे ज्यांच्याकडे किमान ५०० कोटींपेक्षा जास्त संपत्ती आहे. हे लोक व्यवसायिक, प्रोफेशनल्स, गुंतवणूकदार आणि वारसदार अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतले आहेत. यातील सरासरी संपत्ती १४२० कोटी रुपये आहे.

मुंबई ठरलं सर्वात श्रीमंत शहर

मुंबई हे भारताचं सर्वात मोठं आर्थिक केंद्र ठरलं आहे. इथे ५७७ श्रीमंत व्यक्ती आहेत, ज्यांनी स्वत:ची संपत्ती निर्माण केली आहे. एकट्या मुंबईची संपत्ती ही संपूर्ण यादीतील ४०म आहे. दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर त्याचा वाटा हा १७म आहे, तर बेंगळुरू तिसऱ्या स्थानी असून त्याचा वाटा हा ८म आहे.

## फडणवीसांच्या भेटीनंतर आता

राज ठाकरे यांना आपल्या बाजूने वळवण्याची जबाबदारी एकनाथ शिंदे यांनी मंत्री उदय सामंत यांच्यावर सोपवली आहे. काही दिवसांपूर्वी उदय सामंत शिवतीर्थवर 'खिचडी' खाण्यासाठी गेले होते. तेव्हापासून मनसे आणि शिंदे गटाची चर्चा सुरु असून या वाटाघाटी आता अंतिम टप्प्यात असल्याची माहिती आहे. ही चर्चा पूर्णत्वाला नेण्यसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून राज ठाकरेंना लवकरच स्नेहभोजनासाठी निमंत्रण पाठवले जाणार असल्याचीही माहिती मिळत आहे. त्यामुळे ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्याबाबतच्या चर्चांना पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे.

ठाकरे गट आणि मनसेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये जरी दोन्ही भाऊ एकत्र येण्याबाबतची इच्छा असली तरी दोन्ही पक्षाच्या नेत्यांमध्ये तसा उत्साह नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे मनसेपुढे दोन्ही शिवसेनेचे पर्याय असताना, मनसे दोघांपैकी एकासोबत युती करणार की ''एकला चलो रे'' ची भूमिका स्वीकारणार, हे पाहणं महत्वाचे ठरेल. मनसे स्वतंत्र लढल्यास मराठी मतांची विभागाणी होऊन त्याचा फायदा भाजपला होऊ शकतो. त्यामुळे भाजपसाठी राज ठाकरे यांनी स्वतंत्र लढण्याचा पर्याय लाभदायक ठरेल.

## मुख्यमंत्र्यांना एलिमिनेट करण्यासाठी


देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि ते जसे मंत्र्यांचे पीए तपासून घेत आहेत, तसे त्यांनी मंत्री सुद्धा तपासून घेतले पाहिजे. हे असे अघोरी विद्येत रममान असलेले मंत्री महाराष्ट्राचे काय भले करणार? ही अघोरी विद्या जी सुरू आहे ती या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना एलिमिनेट करून तिथे आमचा नेता यावा, यासाठी हे अघोरी विद्येचे प्रकार एसंशि गटाचे लोक ठिकठिकाणी करत आहेत, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

संजय राऊत पुढे म्हणाले की, मी अंधश्रद्धेवर विश्र्वास ठेवत नाही. पण हे समोर येत आहे. कोणत्या मानसिकतेमध्ये या राज्याचे मंत्रिमंडळ आहे? महाराष्ट्राच्या जनतेच्या कल्याणाशी यांना काही पडलेले नाही. जनतेच्या प्रश्र्नाचे काही पडलेले नाही. लोकशाही आणि विचारांचे काही पडलेले नाही. महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री पदावर बसलेल्या व्यक्तीला एलिमिनेट करणं, मी हा शब्द मुद्दामून वापरत आहे. कारण हा शब्द इराण इस्राईल युद्धामध्ये आला आहे. इस्राईलने इराणच्या काही प्रमुख नेत्यांना एलिमिनेट केले आहे, असे त्यांनी म्हटले.

# सुबोध भावे घेऊन येतोय संत तुकाराम यांच्या जीवनावर आधारित नवीन बायोपिक!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी अभिनेता सुबोध भावे मराठी चित्रपटसृष्टीतील बायोपिक किंग म्हणून ओळखला जातो. बालगंधर्व, लोकमान्य तसंच आणि डॉ. काशिनाथ घाणेकर यांसारख्या चरित्रपटांमध्ये त्यांनी, ज्या भूमिकांना जीव दिला, त्यातून त्यांनी इतिहासातील थोर व्यक्तिमत्त्वं पुन्हा जिवंत केली. या बायोपिक्सना प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला. आता सुबोध संत तुकाराम यांच्या जीवनावर आधारित नवीन बायोपिक घेऊन येण्यास सज्ज झाला आहे. या चित्रपटात सुबोध भावे संत तुकारामांची मध्यवर्ती भूमिका साकारत असून, त्याच्या अभिनयातून तुकाराम महाराजांची आत्मिक झळाळी, संघर्षमय जीवन आणि भक्तीची गूढता मोठ्या पडद्यावर प्रभावीपणे उलगडण्याचा प्रयत्न होणार आहे. १७व्या शतकातील महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर उभा राहिलेला हा सिनेमा तुकारामांच्या सामाजिक जागृतीच्या कार्याला आणि भक्ती आंदोलनाला एक नवीन चित्रभाषा देणार आहे.




**संत तुकाराम यांच्या भूमिकेत दिसणार सुबोध भावे**

मराठी संत परंपरेतील तेजस्वी व्यक्तिमत्त्व संत तुकाराम यांच्या जीवनावर आधारित हा भव्य हिंदी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन आदित्य ओम यांनी केलं असून, कर्जन फिल्म्स आणि पुरुषोत्तम स्टुडिओज् यांच्या संयुक्त निर्मितीत ही कलाकृती आकार घेत आहे. हा फक्त एक ऐतिहासिक चित्रपट नसून, तो तुकारामांच्या विचारसरणीचा, त्यांच्या क्रांतिकारी शांततेचा आणि गूढ अशा आत्मानुभूतीचा प्रवास आहे.

**संत तुकाराम आगामी चित्रपटाबद्दल माहिती**

या चित्रपटात अनेक नामवंत कलाकारांची फळी सजली आहे. शिव सूर्यवंशी, शीना चोहान, संजय मिश्रा, अरुण गोविल, शिशिर शर्मा, हेमंत पांडे, गणेश यादव, ललित तिवारी, मुकेश भट्ट, गौरी शंकर, ट्विंकल कपूर, रूपाली जाधव यांसारखे प्रतिभावान कलाकार विविध महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. विशेष म्हणजे, मुकेश खन्ना या चित्रपटाचे निवेदक असून त्यांच्या प्रभावी आवाजात या चित्रपटाला एक वेगळीच आध्यात्मिक उंची मिळणार आहे. चित्रपटासाठी संगीतकार निखिल कामत, रवी त्रिपाठी आणि वीरल–लावण यांनी संगीत दिलं असून, पारंपरिक अभंगांचा भावनिक गंध, शास्त्रीय आणि लोकसंगीताच्या सुरांनी सजलेली संगीतमय मैफिल रसिकांना अनुभवता येणार आहे. ही कलाकृती केवळ संतांचे जीवनच नव्हे, तर त्यांच्या विचारांनी आजही समाजाला किती प्रेरणा मिळते याची प्रचिती देणारी ठरेल, असा निर्माते बी. गौतम यांचा विश्वास आहे. भारताच्या विविध भाषांमधील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी हा चित्रपट सर्व पातळीवर सादर करण्यात येणार आहे.

**कधी होणार चित्रपट रिलीज**

'संत तुकाराम' हा चित्रपट १८ जुलै २०२५ रोजी संपूर्ण जगभरात प्रदर्शित होणार आहे. आता हा चित्रपट पाहण्यासाठी अनेकजण आतुर आहेत. अनेकजण सोशल मीडियाच्या माध्यामातून सुबोध भावे यांना चित्रपटाच्या यशासाठी शुभेच्छा देत आहेत. सुबोध भावे यांचे चाहते त्यांच्या या आगामी चित्रपटासाठी खूप आतुर दिसत आहेत. इंस्टाग्रामवरील शेअर केलेलं चित्रपटाचं पोस्टर जवळपास ७ हजारपेक्षा यूजर्सनं लाईक केलं आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### लवकरच इराणमध्ये सत्तांतर होणार, मोहम्मद रझा पहलवींचे वंशज देशाचे नेतृत्व करणार ?

तेहरान : इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाची तीव्रता वाढू लागली आहे. अमेरिका इस्रायलला इराण विरुद्धच्या संघर्षात मदत करत आहे. आवश्यकता भासल्यास इस्रायलसोबत इराण विरुद्धच्या लढाईत उघडपणे लढण्याचे संकेत अमेरिकेने दिले आहेत. इस्रायलने आवश्यकता भासल्यास अली खमेनेई यांना मारणार, असे स्पष्ट संकेत दिले आहेत. यामुळे इराणमध्ये लवकरच सत्तांतर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. इराणचे सर्वोच्च नेते अली खमेनेई इराण सोडावे लागेल अथवा त्यांची हत्या केली जाईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे. अली खमेनेई यांची जागा रिक्त झाल्यानंतर इराणचे नेतृत्व पुन्हा एकदा इराणचे शेवटचे शहा मोहम्मद रझा पहलवी यांच्या वंशजाकडे अशी चर्चा आहे.

शहा मोहम्मद रझा पहलवी इराणचे नेतृत्व करत होते त्या काळात देशात आधुनिकतेचे वारे वाहू लागले होते. यामुळे इराणचे शेवटचे शहा मोहम्मद रझा पहलवी यांच्या वंशजाकडे नेतृत्व गेले तर पुन्हा एकदा इराणमध्ये आधुनिकतेचे वारे वाहू लागतील, अशी आशा व्यक्त होत आहे. इराणच्या शेवटच्या शहाच्या वंशजाने इराणला उद्देशून एक भाषण केले आहे. प्रसारमाध्यमांनी हे भाषण प्रसारित केले आहे. 'इस्लामिक प्रजासत्ताक कोसळत आहे. भविष्य उज्ज्वल आहे आणि एकत्रितपणे आपण इतिहासाची पाने उलटू' असे इराणच्या शेवटच्या शहाचे वंशज म्हणाले. या भाषणामुळेच इराणमध्ये सत्तांतर होणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे.

### CRR रेशोत कपात केल्यामुळे मिळणार अर्थव्यवस्थेत चालना कर्जपुरवठा 'इतक्या' टक्क्याने वाढणार - एसबीआयचा अहवाल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नुकताच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने रेपो दर व कॅश रिझर्व्ह रेशो मध्ये कपात केली होती. वित्तीय पतधोरण समितीचा हा निर्णय गर्व्हनर संजय मल्हो त्रा यांनी जाहीर केला होता. त्यामुळे सीआरआर मध्ये घट केल्याने अर्थव्यवस्थेतील कर्जपुरवठा मध्ये १.४ ते १.५% वाढ होणार असल्याचा अहवाल स्टेट बँक ऑफ इंडियाने प्रसिद्ध केला आहे. पतपुरवठा सुधारल्याने एक प्रकारे अर्थव्यवस्थेतील तरलता वाढण्यास मदत होणार असल्याचे या एसबीआय अहवालात म्हटले गेले आहे.

'सीआरआर दर कपात केल्याने कर्जदेय संसाधन पुरवण्यात वाढ होणार आहे. ज्यामुळे कर्ज वितरणात याचा फायदा होऊन अतिरिक्त १.४ ते १.५ क्रेडिट वाढेल 'असे निरिक्षण या अहवालात व्यक्त केले गेले. यापूर्वी सेंट्रल बँकेने रेपो दरात ०.५०म बीपीएस बेसिसने कपात केल्याने रेपो दरात ६ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर पोहोचले होते. तर सीआरआर दर १म कमी केल्याने ३म झाला होता.'

याशिवाय सीआरआर घटला म्हणून याचा संबंध कर्जपुरवठ्यातील दरात अथवा ठेवी यांच्या बदलातील नसून हा बँकेच्या नफ्यात वाढ करणारा ठरणार आहे. ज्यामुळे बँकेच्या नेट इंटरेस्ट मार्जिन मध्ये ३ ते ५ पूर्णांक बेसिसने वाढ होईल असे अहवालात म्हटले गेले आहे. अहवालातील माहितीनुसार, या दर कपातीमुळे तरलता वाढून बँकाना मुबलक कर्ज पुरवठा करण्यात मदत होणार आहे त्यामुळे बँकेच्या कोस्ट फंडिग मध्ये घट होत तरलताही निर्माण होईल.

### दहावी-बारावी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** येत्या जून-जुलै मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेतील गैरप्रकार, कॉपी रोखण्यासाठी जिल्ह्यातील १८ परीक्षा केंद्र परिसरात जिल्हादंडाधिकारी राहूल कर्डिले यांनी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केला आहे. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून हा आदेश निर्गमीत केला आहे.

या परीक्षा केंद्रापासून शंभर मीटर परिसरात २४ जून ते १४ जुलै २०२५ या कालावधीत (सुट्टीचे दिवस व रविवार वगळून) सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंतच्या वेळेत परीक्षार्थी, परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतीरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही.

परीक्षा कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तिस कॅल्क्यूलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मीटर पर्यंत परिसरात वापरण्यास, जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास प्रतिबंध केले आहे. या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील १०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास याआदेशाद्वारे प्रतिबंध केले आहे.

# जगबुडीने इशारा पातळी ओलांडली, नदीचं पाणी शहरात घुसलं

## रायगड जिल्ह्यात धडकी भरवणारा पाऊस



दैनिक आपला विदर्भ

**रायगड /प्रतिनिधी :** कोकणातील रायगड जिल्ह्यात काल रात्रीपासून तुफान पाऊस सुरु आहे. या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील खेड आणि नागोठणे या शहरांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण होण्याची चिन्हे आहेत. खेडमधील जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली असून आता नदीचे पाणी मार्केट परिसरात शिरले आहे. अशातच संपूर्ण रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर अजूनही कायम आहे. हवामान खात्यानेही रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे रायगडमध्ये पूरपरिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

खेडमध्ये जगबुडी नदीचे पाणी मटण मार्केटमध्ये शिरण्यास सुरुवात झाली आहे. पुढील काही तास पावसाचा जोर कायम राहिल्यास मुख्य मार्केटमध्येही पावसाचे पाणी शिरु शकते. या परिस्थितीवर स्थानिक प्रशासन सातत्याने लक्ष ठेवून आहे. खेड नगरपरिषद प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुसळधार पावसामुळे जगबुडी आणि नारंगी या दोन नद्यांना पूर आला आहे. त्यामुळे खेड शहरातील अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेले आहेत. परिणामी येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, घाटमाथ्याच्या परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे नागोठणे शहरात रस्ते जलमय झाले आहेत. तसेच अनेक घरांमध्ये पाणी शिरायला सुरुवात झाली आहे. पुढील काही तास असाच पाऊस सुरु राहिल्यास नागोठणे शहरातील घरं पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती पाहता स्थानिक प्रशासनाने नागोठणे परिसरात रस्त्यावर बोटी उतरवल्या आहेत.

हवामान विभागाने आज रायगड जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जाहीर केला असून, पुढील काही तासांमध्ये पावसाचा जोर अधिक वाढण्याचा इशाराही दिला आहे. त्यामुळे आज प्रशासनाकडून सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रोहा, तळा, महाड, पोलादपूर या तालुक्यातील सर्व माध्यमाच्या शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. रोहा तालुक्यातील कुंडलिका नदी आणि खालापूरमधील पाताळगंगा नदी यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून, नागोठणे येथील आंबा नदीने इशारा पातळीच्या वर वाहत आहे. जिल्ह्याला आज ऑरेंज अलर्ट असल्यामुळे किनारपट्टी भागातील मच्छीमार आणि स्थानिक नागरिकांना घरीच राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही सगळी परिस्थिती पाहता जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन पथकांना सज्ज ठेवले आहे.

काल रात्रीपासून रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरु आहे. परिणामी पाली पोलीस ठाणे हद्दीतील अंबा नदीवरील पाली खोपोली रोडवर नदीचे पाणी आल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. या मार्गावरील उन्हेरे फाटा येथील पुलाजवळ दोन्ही बाजूस नदीचे पाणी शिरल्याने येथील मुख्य पुलावरून पाणी जाण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या दुष्टिकोनातून दोन्ही बाजूची वाहतूक बॅरेगेटिंग करुन बंद करण्यात आली आहे. घटनास्थळी कोणतीही दुर्घटना घडू नये, याकरिता पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. दुसरीकडे सुधागड तालुक्यातील खुरावले फाटा येथील भेराव गावाकडे जाणाऱ्या अंतर्गत रोडवरील पुलावर देखील पाणी भरल्याने हा मार्ग वाहतुकीकरिता बंद करण्यात आला आहे.

## मत्स्यकास्तकार, शेतकरी, सहकारी संस्था यांनी मत्स्यबीजाची मागणी नोंदवावी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा भारतीय प्रमुख कार्प जातीच्या अर्थात कटला, रोहू, मृगळ माशांचा पावसाळी प्रजनन हंगाम जूलै २०२५ पासून सुरु होत आहे. मत्स्यव्यवसाय विभागाचे मत्स्यबीज उत्पादन केंद्र, कोराडी, ता. मेहकर जि. बुलढाणा येथे १५ जुलैपासून सुरु करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने मत्स्यकास्तकार, शेतकरी व सहकारी संस्थांनी मत्स्यबीजाची मागणी लेखीस्वरुपात नोंदवावी, असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय सु.ग. गावडे यांनी केले आहे.

सर्व मच्छिमारी सहकारी संस्था आणि मत्स्यकास्तकारांनी फक्त शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्रातूनच बीज खरेदी करणे बंधनकारक आहे. बीज खरेदीची पावती जवळ ठेवणे आवश्यक असून, ती कोणत्याही शासकीय योजनेच्या लाभासाठी आवश्यक मानली जाणार आहे. बाहेरून, इतर जिल्हा किंवा राज्यातून, खाजगी मार्गाने बीज खरेदीसाठी जिल्हा कार्यालयाची पूर्व परवानगी अनिवार्य आहे. विनापरवानगी बीज खरेदी आढळून आल्यास शासन धोरणानुसार कारवाई केली जाईल. मत्स्यबीज संचयनाचे पंचनामे करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय शासकीय योजनांचा लाभ घेणे कठीण होऊ शकते. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी आपल्या शेततळ्यातील किंवा तलावातील संचयनासाठी लागणाऱ्या मत्स्यजिरेची मागणी लेखी स्वरुपात सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), प्रशासकीय इमारत, बस स्थानकासमोर, बुलढाणा येथे त्वरीत नोंदवावी. तसेच अधिक माहितीसाठी सु. ग. गावडे (९२८४८८९६६५), नि. मा. साळुंके, कोराडी केंद्र (९८६०८०९७११), इ. तू. देवकत्ते (८६६९०७२७६८) या मोबाईल क्रमांकावर किंवा कार्यालयाच्या ०७२६२-२४२२५४/ ८८५६९२९४३१ क्रमांकावर संपर्क साधावा. मत्स्य उत्पादन वाढीसाठी हे बीज संचयन अत्यंत उपयुक्त ठरणार असून, सर्वांनी यामध्ये सक्रिय सहभाग द्यावा, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागातर्फे करण्यात आले आहे.

## अभिनेता डिनो मोरिया चौकशीसाठी पुन्हा ईडी कार्यालयात उपस्थित

**मुंबई/प्रतिनिधी :** मिठी नदी गाळ कंत्राटातील ६५ कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी अभिनेता डिनो मोरिया गुरूवारी चौकशीसाठी सक्त वसुली संचलनालयाच्या (ईडी) मुंबई कार्यालयात हजर झाला. यावेळी त्याचा भाऊ सॅन्टिनोही त्याच्यासोबत होता. याप्रकरणी ईडीने १३ आरोपींसह डिनो मोरियाच्या घर आणि १५ हून अधिक ठिकाणी शोधमोहीम राबवली होती. त्यात मुंबई व कोची येथील ठिकाणांचा समावेश होता. डिनो मोरिया युवा सेना नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांचा निकटवर्ती मानला जातो. ईडीने छाप्यांपूर्वी आरोपी व संशयितांनी कथित गैरव्यवहाराच्या कालावधीत संपादित केलेल्या मालमत्ता आणि त्या मालमत्ता खरेदीसाठी वापरलेल्या पैशांच्या स्रोताची तपासणी सुरू केली होती.

## कोल्हापुरात एसटी आगाराच्या महिला वाहकाचा विनयभंग केल्याचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापुर/प्रतिनिधी :** कोल्हापुरातील कागल एसटी आगाराच्या महिला वाहकाचा तिकीट तपासणी पथकातील काही कर्मचाऱ्यांनी विनयभंग केल्याचा आरोप होत आहे. दिवसापूर्वी कागल इचलकरंजी मार्गावरील एसटीमध्ये कर्तव्यावर असताना हा प्रकार घडल्याचा दावा केला जातो. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही कार्यवाही होत नसल्याने आज कोल्हापुरातील एसटी कर्मचारी आक्रमक झाले. महिला वाहकाचा विनयभंग करणाऱ्या एसटी अधिकाऱ्यांसह त्यांना पाठीशी घालणाऱ्या वरिष्ठांवर कारवाई करावी या मागणीसाठी आज एसटी कष्टकरी जनसंघाने निदर्शने केली.

एसटी कष्टकरी जनसंघाने कोल्हापुरातील मध्यवर्ती बस स्थानक परिसरात असलेल्या एसटी विभागीय कार्यालयाबाहेर आंदोलन केलं. एसटी कर्मचाऱ्यांनी या गंभीर कृत्याचा काळ्याफिती लावून निषेध केला प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील केली. अधिकाऱ्यांनी मारहाण विनयभंग आणि जातीवाचक शिवीगाळ केलाचा देखील आरोप महिला वाहकानी केला. विनयभंग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा या वेळेस एसटी कष्टकरी जनसंघाने दिला.

## निमगाव वायाळ तलाव मासेमारी ठेक्यासाठी निविदा आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहिर केलेले आहे. त्यानुसार सन २०२५-२६ वर्षाकरिता, बुलढाणा जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील सिंदखेडराजा तालुक्यातील निमगाव वायाळ १० हेक्टर तलावाच्या निर्धारित कार्यक्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासन निर्णय, अटी व शर्तीनुसार तलाव मासेमारी ठेक्याने देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी तलाव ठेका घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह दि. २४ जून २०२५ पर्यंत सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा येथे सादर करावेत.

सन २०२५-२६ करीता बुलढाणा जिल्ह्यातील १० हेक्टर क्षेत्रफळाचा निमगाव वायाळ तलाव मासेमारी ठेका दि. ३० जून २०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सदर तलावाच्या कार्यक्षेत्रातील योगेश मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या. केशवशिवणी यांनी तलाव घेण्यास नकार दिल्यामुळे हा तलाव अन्य पात्र संस्थांना देण्यात येणार आहे. त्यानुसार इच्छुक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह पूर्ण प्रस्ताव सादर करावेत.

आवश्यक कागदपत्रे : विहीत नमुन्यातील तलाव ठेका मागणी अर्ज (नमुना-१), ठराव व अर्ज, नोंदणी नाहरकत प्रमाणपत्र, उपविधी व ९७ वी घटना दुरुस्तीची प्रत, कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र, थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र, संचालक मंडळ यादी, मागील ३ वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, बँक स्टेटमेंट (३ वर्षांचे), नफा-तोटा पत्रक (३ वर्षांचे), मत्स्यबीज संचयन व उत्पादन अहवाल (५ वर्षांचा), इतर उपयुक्त दस्तऐवज (, विमा, ई-श्रम कार्ड इ.), ४ हजार ५०० रुपयांचा धनादेश, एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त सभासद नसल्याचे प्रमाणपत्र व अटी-शर्ती हमीपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

# १८० फुटांच्या बदल्यात मिळणार ४५० चौरस फुटांचे घर; ९८४ कुटुंबांना लागली खरी लॉटरी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जोगेश्वरी (पूर्व) येथील पूनमनगर मेघवाडी या पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील वसाहतीच्या पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू झाली आहे. 'म्हाडा' मार्फत वसाहतीच्या पुनर्विकासासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यासाठी निविदा प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. या प्रकल्पाअंतर्गत रहिवाशांना १८० फुटांच्या बदल्यात ४५० चौरस फुटांचे घर मिळणार आहे. साडेतीन वर्षाच्या कालावधीत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा 'म्हाडा'चा संकल्प आहे.

**कशी आहे या वसाहतीची सध्याची रचना**

सुमारे २७,६२६ चौरस मीटरवर वसलेल्या पूनमनगर पीएमजीपी वसाहतींचे पुनर्वसन कंत्राटदाराची नेमणूक करून म्हाडाच्या माध्यमातून होत आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे ९८४ कुटुंबीयांचे अत्याधुनिक सदनिकेमध्ये पुनर्वसन करण्यात येणार आहे. १९९०-९२ दरम्यान पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत उभारलेल्या वसाहतीत तळमजला अधिक ४ मजले असलेल्या एकूण १७ इमारती आहेत. वसाहतीमध्ये ९४२ निवासी व ४२ अनिवासी अशा एकूण ९८४ कुटुंबीयांचे वास्तव्य आहे. सुमारे तीन दशकांपूर्वी उभारलेल्या या इमारती आता अत्यंत जीर्णावस्थेत आहेत.

पुनर्विकासासाठी २०१० मध्ये बिल्डरची नेमणूक करण्यात आली होती. परंतु बिल्डरकडून बराच काळ हा पुनर्विकास प्रकल्प रखडला होता. त्यामुळे इमारती जीर्ण व धोकादायक झाल्या होत्या. यावर प्रकल्प म्हाडामार्फत राबविण्याची विनंती करण्यात आली. त्यानुसार १५ डिसेंबर २०२० मध्ये शासनाने बिल्डरची नेमणूक रद्द केली. प्रकल्प म्हाडामार्फतच राबविण्याचे निर्देश दिले.

**बीडीडी चाळीतील २३००+ रहिवाश्यांना मिळणार चाव्या**

वरळी आणि नायगाव येथील बीडीडी चाळींच्या जागेवर उंच व आलिशान टॉवर्स उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून सप्टेंबरपर्यत सुमारे २३०० रहिवाशांना त्यांच्या नव्या घरांच्या चाव्या मि



ळणार आहेत. वरळी बीडीडीतील ५५६ सदनिकांचे वाटप येत्या दोन आठवड्यांत तर १४१९ सदनिकांचे हस्तांतरण येत्या सप्टेंबर महिन्यात करण्यात येणार आहे. नायगाव बीडीडीतील ३४२ रहिवाशांना नव्या सदनिका येत्या डिसेंबर महिन्यात सुपूर्द केल्या जाणार आहेत. वरळी बीडीडी चाळीतील ९८६९ पुनर्वसन सदनिकांपैकी ३८८८ सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून पुढील दोन आठवड्यांत ५५६ सदनिकांचे हस्तांतरण होणार आहे. तसेच १४१९ सदनिकांचे सप्टेंबर २०२५ मध्ये हस्तांतरण करण्यात येणार आहे. तर १६४२ सदनिकांचे हस्तांतरण ऑगस्ट २०२७ पर्यत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

नायगाव बीडीडी चाळीतील ३३४४ सदनिकांपैकी १९३८ सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून सप्टेंबर २०२५ मध्ये ८६४ सदनिकांचे हस्तांतरण करण्याचे नियोजन असल्याचे या वेळी सांगण्यात आले. ना.म. जोशी मार्ग बीडीडी चाळीच्या प्रकल्पातील २५६० पुनर्वसन सदनिकांपैकी १२४१ सदनिकांचे काम प्रगतीपथावर आहे. यापैकी ३४२ सदनिकांचे हस्तांतरण डिसेंबर २०२५ पर्यत करण्यात येणार आहे.

# बालमृत्यू कमी करण्यासाठी 'स्टॉप डायरिया' अभियानाला जिल्ह्यात सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात पाच वर्षांखालील बालकांमध्ये अतिसारामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी १६ जून ते ३१ जुलै २०२५ दरम्यान 'स्टॉप डायरिया' अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ स्थानिक नागरी आरोग्य केंद्र, बुलढाणा येथे उत्साहात पार पडला.

उद्घाटन सोहळ्याला जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल जवरे, डॉ. सपना मोरे, डॉ. शाकीर यांची उपस्थिती होती. यावेळी आशा स्वयंसेविकांनी (ओरल रिहायड्रेशन सॉल्यूशन) ORS चे प्रात्यक्षिक करून अतिसारामुळे शरीरातील होणाऱ्या जलशुष्कतेपासून बचाव कसा करता येतो, हे प्रत्यक्ष दाखवले. कार्यक्रमास दीपक महाले ((IFM), गणेश परिहार (TSA), पूजा जाधव (LHV), आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका व अन्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील गाव व शहरी भागातील अंगणवाड्या, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्रे व शासकीय संस्था यामधील ० ते ५ वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. अतिसाराची लक्षणे आढळणाऱ्या बालकांना व झिंक सप्लीमेंट तात्काळ दिले जाणार आहे. अभियानासाठी आवश्यक असलेले आणि झिंक पावडरचे साहित्य सर्व अंगणवाडी केंद्रे व आरोग्य संस्थांमध्ये आधीच वितरित करण्यात आले आहे. यासोबतच स्तनपान प्रोत्साहन, रोटा व्हायरस लसीकरण, हातांची स्वच्छता, सुरक्षित पाण्याची उपलब्धता यासारख्या आरोग्यविषयक बाबतीत मार्गदर्शन दिले जाणार आहे.



अंगणवाडीतील बालकांना, शाळकरी विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना हात धुण्याची योग्य पद्धत शिकविण्यासाठी विशेष प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानात आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, नगर परिषद, शिक्षण विभाग आदींचा समन्वयाने सहभाग असून, अभियान यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी केले आहे.

## विविध वृत्त...

### त्या अपघाताची चौकशी करा ; मनसे जिल्हा उपाध्यक्ष कठाळे यांचे ठाणेदाराला निवेदनाद्वारे मागणी



दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा /प्रतिनिधी :** साई पिली कन्सट्रक्शन कंपनीच्या प्लांटवर (बागवाडी) झालेल्या अपघाताची चौकशी करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब कठाळे यांनी दारव्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदारांना १९ जून निवेदनाद्वारे केली आहे. ठाणेदार यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दारव्हा तालुक्यातील बागवाडी शिवारात साई प्रिती कन्सट्रक्शन कंपनीच्या प्लांट वर १७ जून रोजी गिट्टी क्रशरच्या क्रोम्प्रेसरमध्ये स्फोट होऊन एका मजुराचा दुर्दैवी मृत्यु झाला आणि एक इसम गंभीर जखमी झाला. या सर्व प्रकरणामध्ये कंपनीच दोषी आहे. कंपनीने कामगारासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजनांची व्यवस्था केली नसल्याने आणि मशीनची वेळोवेळी देखरेख व दुरुस्तीची तपासणी न केल्यामुळेच हा अपघात झाला आहे.तरी आपण या प्रकरणाची सखोल चौकशी करून कंपनी मालकावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा. अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब कठाळे यांनी दारव्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनावर लाला पांडे, सुरज चव्हाण, रंणजित झोंबाडे, राजू वाड्रसवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पॉक्सो गुन्ह्यातील फरार आरोपी शिक्षकास अटक ; बिटरगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिंदे यांची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग प्रकरणातील आरोपी शिक्षकास सात महिन्यांनंतर अटक करण्यात आली.विशेष म्हणजे बिटरगाव पोलीस स्टेशनला नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक पांडुरंग शिंदे यांनी ही कारवाई केली आहे.

सात महिन्या पूर्वी ढाणकी जिल्हा परिषद उर्दू शाळेतील शिक्षक शेख जमीर शेख नजीर ने शाळेतील सहाव्या वर्गात शिकणाऱ्या मुलीचा विनयभंग केला होता. याप्रकरणी बिटगाव पोलिस ठाण्यात शिक्षकाविरुद्ध पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटना गांभीर्याने घेत यवतमाळच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी पंचाकडे चौकशी केली असता सदर शिक्षकाने चार मुलींचा विनयभंग केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते. त्यानंतर पालकांनी या शिक्षकावर कठोर कारवाई करून त्याला निलंबित करण्याचा आदेश देण्याची मागणी केली होती. या प्रकरणातील आरोपी शिक्षक फरार होता.आरोपीचा शोध चालू असताना बिटरगाव पोलीस स्टेशनला पोक्सो गुन्ह्यातील फरार आरोपी शेख जमीर शेख नजीर रा.उमरखेड हा मागील सात महिन्यानंतर अटक करण्यात आली. पोलिसांनी आरोपीला १८ जून २०२५ रोजी पुसद कोर्टात हजर करण्यात आले. सदर ची कार्यवाही यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पीयूष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरखेडहनुमंत गायकवाड यांच्या मागदर्शनात ठाणेदार पांडुरंग शिंदे, पोहेका रवी गिते, प्रवीण जाधव यांनी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमावर हे करित आहेत.

### खडकवासला धरणातून २ हजार क्युसेक्सने विसर्ग

**मुंबई/प्रतिनिधी :** खडकवासला धरण परिसरात होत असलेला पाऊस आणि खडकवासला धरणामध्ये येत असलेल्या पाण्याचा प्रमाण पाहता खडकवासला धरणातून आज १९ जून रोजी दुपारी एक वाजता २ हजार क्युसेक्सने विसर्ग सोडण्यात येणार आहे. पावसाचे प्रमाण पाहता या विसर्गात टप्प्याटप्प्याने वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पुणे महानगरपालिका परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले.

## इंदिरा गांधी निवृत्तीवेतन योजना; एनएसएपी पोर्टलवर आधार व्हेरिफिकेशन करा

### जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दपकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी दिव्यांग निवृत्तीवेतन योजना यांच्यांतर्गत एकूण ५२ हजार ३६५ लाभार्थी केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. परंतु त्यापैकी ५ हजार १३७ लाभार्थ्यांचे आधार व्हेरिफिकेशन प्रलंबित असल्याने योजनेचा लाभपासून वंचित राहू शकतात. त्यामुळे लाभार्थ्यांनी NSAP पोर्टलवर तातडीने आधार व्हेरिफिकेशन करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

डिसेंबर २०२४ पर्यंत लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या अनुदानाचा हिस्सा (₹२००/₹३००/₹५००) पोर्टलमार्फत तर राज्य शासनाचा हिस्सा (₹१३००/₹१२००/₹११००) तहसील कार्यालयामार्फत प्रणालीने खात्यात जमा करण्यात येत होता. परंतु, जानेवारी २०२५ पासून राज्य शासनाच्या विशेष सहाय्य विभागाच्या नव्या धोरणानुसार अनुदानाचा राज्य हिस्सा थेट लाभार्थ्यांच्या खात्यात डिबीटी ( Direct Benefit Transfer) प्रणालीद्वारे जमा केला जात आहे. त्यामुळे, लाभार्थ्यांचे आधार NSAP पोर्टलवर व्हेरिफाय होणे अत्यावश्यक आहे. यासाठी आधारमध्ये अद्ययावत माहिती आणि मोबाईल क्रमांक लिंक असणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील ५ हजार १३७ लाभार्थ्यांचे आधार व्हेरिफिकेशन प्रलंबित आहे. त्यामुळे, लाभ बंद होण्यापूर्वी त्वरीत आधार व्हेरिफिकेशन करुन घ्यावी. तसेच आपले नाव यादी असल्याची खात्री करावी. आपले नाव यादीत असल्यास आधार कार्ड अद्ययावत करावे, मोबाईल नंबर लिंक करावा, संबंधित तहसील कार्यालयात आधार सादर करून NSAP पोर्टलवर व्हेरिफिकेशन करून घ्यावे. आधार व्हेरिफिकेशन न केल्यास आपला लाभ थांबविण्यात येऊ शकतो. अशा परिस्थितीत संपूर्ण जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

## शहापूर: समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, वाहनांचा चक्काचूर, दोन ठार, ७ जखमी

दैनिक आपला विदर्भ

**शहापूर/प्रतिनिधी :** काही दिवसांपूर्वीच समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले होते. नव्याने सुरू झालेल्या महामार्गाच्या टप्प्यावर अपघात झाला आहे. समृद्धी महामार्गावर कोळकेवाडी आणि आमने टोलनाका दरम्यान शहापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या वाशिंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत पहाटे ५ वाजण्याच्या सुमारांस दोन वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जण ठार झाले आहेत. तर, ७ जण जखमी झाले आहेत. या अपघातात वाहनाचा चक्काचूर झाला आहे.

समृद्धी महामार्गावर क्रुझर जीप आणि ट्रकमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा मृत्यू तर ७ जण जखमी झाल्याची घटना पहाटेच्या सुमारास घडली आहे. या अपघातात अब्दुल पाशा शेख (६५ वर्ष), जाहीद सिद्दिकी (४० वर्ष) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर, सात जण जखमी आहेत त्यापैकी दोन ते तीन जणांचे प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

परभणी जिल्ह्यातून भिवंडी येथे आपल्या नातेवाईकांकडे येत असताना वाशिंद आणि आमने दरम्यान फोर्स वाहन क्रमांक श्क २२ अें ५३६० चा वाहन चालक माऊली गुंजाळ पाथरी ते भिवंडी जात होते. त्याच दरम्यान चॅनल नंबर ६९० वर पावसामुळे आणि झोपेमुळे त्यांना समोरील वाहन दिसले नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे त्यांनी समोरील वाहन क्रमांक श्क-४८ एँ-३९५३ या वाहनास भरधाव वेगाने मागून धडक दिली. मात्र, या अपघातानंतरही धडक बसलेले वाहन थांबले नसल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, दुसऱ्या वाहनातील २ जणांचा मृत्यू झाला. तर, ७ जण जखमी झाले.

## शेतकऱ्यांनी पेरणीअगोदर बीज प्रक्रिया करून पेरण्या करावे : कृषिदूतांनी केले शेतकऱ्यांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** उमरखेड येथील कृषी महाविद्यालयतील कृषीदुतानी बिजप्रक्रिया करून पेरणी केल्यास शेतकऱ्याचा अनावश्यक खर्च कमी होऊन झाडांची सरासरी प्रमाण राहण्यात मदत होते. तरीही सर्व शेतकऱ्यांनी पेरणीअगोदर ब्रीजप्रक्रिया करून पेरण्या करावे असे आवाहन करीत कृषिदूतांनी पळशी येथिल शेतीच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले

मान्सून दाखल झालेला असून सर्व शेतकऱ्यांची पेरणी सुरू झालेली आहे. पेरणी योग्य पाऊस पुढील दोन-तीन दिवसात होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. उमरखेड तालुक्यामध्ये सोयाबीन पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात होत असून प्रमाणित व दर्जेदार बियाणे महत्त्वाचे झाले आहे. बियाणे नवे असो किंवा घरचे जूने पेरणीपूर्वी सदर बियाण्याची उगवण




क्षमता तपासणे अत्यावश्यक असल्याचे मार्गदर्शन कृषीदूत जयेश देशमुख,अनुज गावंडे, अर्जुन सुरोश, प्रथमेश जराड, ओम जरांडे, देवाशिष हातमोडे, सौरभ कोरके यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कृषिदूतांनी शेतकऱ्यांच्या शंकेचे निराकरण केले.

याकरिता प्राचार्य एस. के. चिंतले, ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम अधिकारी ए. बी. इंगळे, वाय. एस. वाकोडे, ए. एस. राऊत तसेच विषय तज्ज्ञ डॉ. एस. बी. मातीखाये यांचे मार्गदर्शन लाभले. व तसेच गावातील सरपंच शाम घायडे प्रगतिशील शेतकरी सतीश कदम, बाबुराव येनकर, जयंतवराव कदम, सुनिल सदावर्ते, बालाजी बारसकर, नितीन वानरे, शिवानंद बारसकर व इतर गावकरी उपस्थित होते.

## लोकल ट्रेनमध्ये दरवाज्यात लटकत उभं राहणं बंद; मध्य रेल्वेचे महत्त्वाचे निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** रेल्वे सुरक्षा बल आणि लोकमार्ग पोलीस यांनी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आता महत्वाची पावलं उचलली आहेत. बॅगधारक प्रवाशांनी लोकलच्या दरवाजामध्ये उभं राहू नये याची खबरदारी घेण्यासाठी संध्याकाळच्या वेळी गर्दी असताना मुख्य स्थानकात प्लॅटफॉर्मवरती अतिरिक्त जवान तैनात केले जाणार आहेत. आता लोकल ट्रेनच्या दरवाज्यात उभं राहणाऱ्या प्रवाशांना मनाई करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी चालत्या ४ प्रवाशांचा लोकलमधून पडून मृत्यू झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. संध्याकाळच्या पीक अवर्सला मुख्य स्थानकांच्या प्लॅटफॉर्मवर अतिरिक्त जवान तैनात केले जाणार आहेत. काही दिवसांपूर्वी चालत्या ट्रेनमधून पडून चार जणांचा मृत्यू झाला होता. या अपघातामागे बॅग घासण्याचे कारण देण्यात आले होते. त्यानंतर आता खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर लोकांच्या गर्दीवरती नियंत्रण ठेवण्यासाठी सुरक्षा आणि महामार्ग पोलिसांनी खबरदारी घेतली आहे.

## वनविभागाच्या निषेधार्थ आदीवासींचे बेमुदत उपोषण, रविकांत तुपकर यांनी भेट देऊन दिला पाठिंबा

दैनिक आपला विदर्भ

**मोताळा/प्रतिनिधी :** तालुक्यातील माळेगाव व मोहेगाव येथील आदिवासी भिल्ल समाज बांधवांचे घर व शेती वनविभागाने बेकायदेशीरपणे उद्ध्वस्त केल्याच्या निषेधार्थ, आदीवासी बांधवांनी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अम्रपाल वाघमारे यांच्या नेतृत्वात व नरहरी गवई, आशिष बाबा खरात, राजेंद्र मोरे, नंदिनीताई टारपे यांच्या मार्गदर्शनाखाली १६ जून पासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे.




या उपोषणाला क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक नेते रविकांत तुपकर यांनी भेट देऊन पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. मोताळा तालुक्यातील आदिवासी बांधवांनी १९९८ पासून या जमिनीवर राहत असून शेती करून उपजीविका चालवतो.

मात्र, वनविभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता पोलीस बळाचा वापर करून घरं व शेती उद्ध्स्त केली. पावसाळ्याच्या तोंडावर आदिवासी बांधव बेघर झाले असून, हे अमानवी कृत्य थांबवले जावे, घर व शेती मूळ ठिकाणी तात्काळ पुनर्वसित करावी, पूर्व मशागतीस अडथळा होऊ नये, व ट्रॅक्टर,औजारांची परवानगी द्यावी, बेकायदेशीर निष्कासन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, नामंजूर झालेल्या वनदाव्यांना पुन्हा अर्ज करण्याची संधी द्यावी,१९९० पूर्वीपासून कसत असलेल्या गायरान जमीन धारकांना कायम पट्टे द्यावेत, सौर प्रकल्प पडीक जमिनीत घ्यावे, जिगाव प्रकल्पातील बाधित गायरान धारकांना मोबदला द्यावा, संबंधित तहसीलदार व वनअधिकाऱ्यांवर योग्य ती चौकशी करून कारवाई करावी आदी मागण्यासाठी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १६ जून पासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे.